**Nutan Maratha College and The Unique Academy Felicitated Qualified Students in Competitive Examination.**

लोकमत



गुणवंतांचा गौरव करताना मान्यवर.

# 'द युनिक अकॅडमी'तर्फे गुणवंतांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** नूतन मराठा महाविद्यालय व 'द युनिक अकॅडमी जळगाव' यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार बुधवारी जगदीश चंद्र बोस सभागृहामध्ये प्राचार्य डॉ.एल.पी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून सह.आयुक्त समाज कल्याण विभाग योगेश पाटील, तहसीलदार नामदेव पाटील, महिला नायब तहसीलदार प्राजक्ता केदार, प्रा.सुनील गरुड हे मान्यवर उपस्थित होते. युनिक अकॅडमीचे जळगाव शाखेचे समन्वयक विकास गिरासे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी यशस्वी विद्यार्थी कोमल शिंदे, दीपाली सूर्यवंशी, रोहन राणे, कैलास पावरा, भूषण पाटील, नितेश फरकांडे, गौरव भावसार, शिवानी देशमुख, महेंद्र सोनगिरे, ओम सुरडकर, अतुल पाटील यांचा गौरव करण्यात आला.

यशस्वितेसाठी प्रा.अंकुश देशमुख, प्रा.प्रीती तारकस, नरेंद्र पाटील, प्रीती पाटील, टीना सुर्वे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजेंद्र देशमुख यांनी, तर आभार सुनील गरुड यांनी मानले.

(वा.प्र.)

Hello Jalgaon
Page No. 2 Aug 05, 2023
Powered by: erelego.com